मानव विकास कार्यक्रमाची व्याप्ती वाढविणे व
मानव विकासावर आधारीत योजना राबविणे.

महाराष्ट्र शासन ,
नियोजन विभाग,
शासन निर्णय क्र.:- माविमि -२०१०/प्र.क्र. ८१ /का.१४१८
मंत्रालय,मुंबई-४०००३२.
दिनांक १९ जुलै, २०११

वाचा - शासन निर्णय, नियोजन विभाग, क्र ममावि-२००६/प्र.क्र.२०/का.१४१३,दि.२९ जून,२००६

प्रस्तावना :- राज्यातील १२ अतीमागास जिल्ह्यांचा मानव विकास निर्देशांक उंचावण्याकरीता संदर्भाधीन दि. २९ जून, २००६ च्या शासन निर्णयान्वये महाराष्ट्र मानव विकास मिशनची स्थापना करण्यात आली होती. आरोग्य, शिक्षण व उत्पन्नवाढ या बाबींशी संबंधित स्थानिक गरजेनुसार विविध योजना मिशनने आपल्या कार्यक्षेत्रामधील १२ जिल्हातील २५ तालुक्यांमध्ये राबविल्यामुळे संबंधित तालुक्यांच्या मानव विकासासंबंधीच्या अनेक निर्देशांकात लक्षणीय वाढ झालेली आहे.

२. मा.मंत्री,वित्त व नियोजन यांनी दि.२५ मार्च २०१० रोजी अर्थसंकल्पीय भाषणाच्या वेळी मानव विकास ही संकल्पना जिल्ह्याऐवजी तालुका स्तरावर राबवून सदर कार्यक्रमाची व्याप्ती वाढविण्याची घोषणा केली होती. ही बाब विचारात घेऊन मानव विकासावर आधारीत योजना राबविण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

३. या संदर्भात दि.१० मार्च, २०११ रोजी मा. मुख्यमंत्री यांचेकडे मा. उपमुख्यमंत्री , मा. मुख्य सचिव, सर्व संबंधित विभागांचे प्रधान सचिव / सचिव , कार्याध्यक्ष, मानव विकास मिशन , यशदा, युनिसेफ यांचे प्रतिनिधी यांचेसोबत आयोजित केलेल्या बैठकीत, प्रत्येक तालुक्यास अधिक निधी प्राप्त व्हावा व त्या निधीतून योजनांची प्रभावी अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीने राज्यातील १२५ तालुके निवडणे योग्य होईल असे सर्वानुमते ठरले. त्यास अनुसरून सादर केलेल्या प्रस्तावास मंत्रीमंडळाने मान्यता दिली असून खालीलप्रमाणे योजना राबविण्याचा निर्णय घेतला आहे :-

शासन निर्णय :-

४. मानव विकास कार्यक्रम राज्यातील विहित निकषानुसार निवडलेल्या तालुक्यांमध्ये सुधारित व विस्तारित स्वरूपात राबविण्यात येईल. या कार्यक्रमाचे स्वरूप खालीलप्रमाणे राहील :-

i) हा कार्यक्रम "जिल्हा" ऐवजी "तालुका" हा घटक विचारात राबविण्यात येईल.

ii) मागासलेल्या तालुक्यांच्या निवडीसाठी सन २००१ च्या जनगणनेनुसार तालुक्यातील स्त्री साक्षरतेचे प्रमाण व सन २००२ च्या सर्वेक्षणानुसार ग्रामीण भागातील दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांचे प्रमाण हे दोन निकष विचारात घेण्यात आलेले आहेत.

iii) वरील निकषांच्या आधारे राज्यातील अतिमागासलेल्या १२५ तालुक्यात या कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यात येणार आहे. निवडण्यात आलेल्या तालुक्यांची यादी **विवरणपत्र १** मध्ये दिली आहे.

iv) वरील मुद्दा क्र.ii) मध्ये निश्चित केलेल्या निकषानुसार निवडलेल्या तालुक्यांची निवड एक वर्षाकरिता असेल. मानव विकास निर्देशांकाची निश्चिती करण्याबाबत शासन निर्णय, नियोजन विभाग, क्र. ममावि-२०११/ प्र.क्र.२१/का.१४१८, दि. १३ एप्रिल २०११ अन्वये, यशदा या संस्थेची नेमणूक केली आहे. त्यांचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर तालुक्यांच्या निवडीत यथोचित सुधारणा करण्यात येईल.

v) प्रत्येक वर्षी या कार्यक्रमासाठी उपलब्ध होणारा निधी विचारात घेऊन निधीचे वाटप सर्वसाधारणपणे तालुक्यांची लोकसंख्या विचारात घेवून करण्यात येईल.

vi) या कार्यक्रमाची व्याप्ती वाढविण्यात आल्यामुळे पूर्वीच्या कार्यपध्दतीमध्ये बदल करण्यात आला असून निवडलेल्या तालुक्यांमध्ये कोणकोणत्या योजना राबवाव्यात अशा योजनांची यादी व अंमलबजावणीची पध्दत सोबतच्या **विवरणपत्र २** मध्ये दर्शविण्यात आली आहे. सदर कार्यपध्दतीनुसार योजनांची अंमलबजावणी करावी व यामध्ये काही शंका/अडचणी असल्यास त्याबाबत शासनाकडून मार्गदर्शन घ्यावे.

vii) वरील मुद्दा क्र.vi) मध्ये नमुद योजनांव्यतीरीक्त कांही योजना राबवायच्या झाल्यास, त्याबाबत वेळोवेळी शासनाकडून सूचना देण्यात येतील. तसेच स्थानिक गरज लक्षात घेऊन, अन्य योजनांचा समावेश करावयाचा असल्यास त्यास शासनाची मान्यता घेणे आवश्यक राहील.

vii) या कार्यक्रमासाठी निश्चित केलेल्या निधीतून ९५ टक्के निधी योजना राबविण्यासाठी खर्च केला जाईल व ५ टक्के निधी प्रशासकीय बाबींवर करण्यात येईल. यामध्ये प्रामुख्याने, कर्मचा-यांचे मानधन, वेतन व कार्यालयीन खर्च, क्षमतावृध्दी प्रशिक्षण व योजनांचे त्रयस्थ संस्थेमार्फत मूल्यमापन इ.बाबी समाविष्ट राहतील.

viii) केंद्रपुरस्कृत / राज्यस्तरीय / जिल्हा योजना / मानव विकास कार्यक्रम अशा कार्यक्रमापैकी एकाच कार्यक्रमातून लाभ देण्यात यावा. असा लाभ देताना अन्य योजनांमधून लाभ देणे शक्य नसेल अशाच वेळी या कार्यक्रमातून लाभ देण्यात यावा.

राज्यस्तरीय प्रशासन :-

५. i) मानव विकास कार्यक्रम व मानव विकास आयुक्त कार्यालय यांचेवर नियोजन विभागाचे नियंत्रण राहिल.

ii) मानव विकास आयुक्त कार्यालय अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या कार्यक्रमाचा आढावा घेण्याकरिता व यासंदर्भात शासन पातळीवर धोरणात्मक निर्णय घेण्याकरिता राज्यस्तरीय समिती स्थापन करण्यात आली असून त्या समितीची रचना खालीलप्रमाणे आहे.:-

मा. मंत्री, वित्त व नियोजन	- अध्यक्ष
मा. मंत्री, सार्वजनिक आरोग्य	- सदस्य
मा. मंत्री, महिला व बालकल्याण	- सदस्य
मा. मंत्री, शालेय शिक्षण	- सदस्य
मा. मंत्री, रोजगार व स्वयंरोजगार	- सदस्य
मा. मंत्री, उद्योग	- सदस्य
मा. मंत्री, कृषी	- सदस्य
मा. मंत्री, पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय	- सदस्य
मा. मंत्री, ग्रामविकास	- सदस्य
मा. राज्यमंत्री, वित्त व नियोजन	- सदस्य
मा. मुख्य सचिव	- सदस्य
अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य	- सदस्य
प्रधान सचिव, नियोजन	- सदस्य
प्रधान सचिव (वित्त)	- सदस्य
प्रधान सचिव, रोजगार व स्वंयरोजगार	- सदस्य
प्रधान सचिव, (कृषि) कृषी व पदुम	- सदस्य
प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रिडा	- सदस्य
प्रधान सचिव, उदयोग	- सदस्य
सचिव, ग्रामविकास	- सदस्य
सचिव, महिला व बालविकास	- सदस्य
आयुक्त ,मानव विकास	- सदस्य सचिव

iii) शासनाच्या संदर्भाधीन दि.२९ जून २००६ च्या निर्णयानुसार, सुरु झालेल्या मानव विकास मिशन कार्यक्रमाचे " कार्याध्यक्ष " या पदनामास "आयुक्त, मानव विकास "असे संबोधण्यात येईल. सध्याच्या मानव विकास कार्यालयातील पदांची पुनर्रचना करुन खालीलप्रमाणे अधिकारी / कर्मचारीवर्ग उपलब्ध करुन देण्यात येत आहे:-

दि.२९ जून २००६ च्या शासन निर्णयानुसार पदनाम	पदांची संख्या	सुधारीत पदनाम	पदांची संख्या
विशेष कार्य अधिकारी (उप आयुक्त श्रेणी)	१	उप विकास आयुक्त (मानव विकास) तथा सह संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय (गट अ)	१
सहाय्यक आयुक्त, वर्ग -१	१	सहाय्यक आयुक्त मानव विकास तथा उपसंचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय (गट -अ)	१
लेखाधिकारी, वर्ग -२	१	लेखाधिकारी, गट - ब, लेखा व कोषागारे संचालनालय	१
लघुलेखक (इंग्रजी)	१	सांख्यिकी सहाय्यक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय	२
लघुलेखक (मराठी)	१	लघुलेखक (मराठी)	१
लिपिक	२	लिपिक	२
शिपाई	३	शिपाई	२
एकूण	१०	एकूण	१०

iv) वरील नियमित पदांव्यतिरिक्त कामाची व्याप्ती लक्षात घेऊन काही पदे शासनाच्या मान्यतेने कंत्राटी पध्दतीने भरता येतील.

v) कार्यान्वयीन यंत्रणा / क्षेत्रीय अधिका-याचे किंवा विभागाचे काम असमाधानकारक असल्याचा अहवाल मानव विकास आयुक्त यांचेकडून प्राप्त झाल्यास त्याबाबत शासनाच्या संबंधित विभागाच्या सचिवांना नियोजन विभागामार्फत कळविण्यात येईल. अशा अहवालावर कारवाई करण्याची जबाबदारी संबंधित विभागावर राहील.

vi) मानव विकास कार्यक्रमातील योजनेच्या अंमलबजावणीमधील अनियमिततेस संबंधित अंमलबजावणी यंत्रणा व पर्यायाने त्यांचा प्रशासकीय विभाग जबाबदार राहील.

आयुक्त, मानव विकास यांचे अधिकार :-

६. आयुक्त, मानव विकास यांचे अधिकार व जबाबदा-या खालीलप्रमाणे असतील:-

i) मानव विकास निर्देशांकाची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी शासनाने निश्चित केलेल्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी सनियंत्रण करणे.

ii) राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय पातळीवर काम करणा-या संस्थांच्या सहकार्याने मानव विकास कार्यक्रम प्रभावीपणे राबविणे.

iii) मानव विकास आयुक्तालयाच्या कार्यालयीन वापरासाठी जागा भाड्याने घेणे व कार्यालयीन खर्चास मान्यता देणे.

iv) मानव विकासाचे उद्दिष्ट साध्य करण्याकरिता वेगवेगळ्या विभागांच्या कार्यक्रमात काही धोरणात्मक बदल करावयाचे असल्यास, त्याबाबतचा प्रस्ताव नियोजन विभागामार्फत संबंधित विभागास सादर करणे.

v) जिल्हा व तालुका स्तरवरील मानव विकास समित्यांच्या कामकाजाची कार्यप्रणाली निश्चित करणे.

vi) मानव विकास आयुक्तालयाकरिता पदे भरण्याची मुभा आयुक्तांना असेल. आयुक्त कार्यालयाकरिता प्रतिनियुक्तीने शासन सेवेतील अधिकारी, कर्मचारी उपलब्ध न झाल्यास, सदरची पदे निवृत्त शासकीय / निमशासकीय अधिका-यांना नियुक्त करून अथवा संबंधित जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्रातील नोंदणीकृत पात्र उमेदवारांकडून प्रथमतः एक वर्षाकरिता कंत्राटी पध्दतीने भरणे व आवश्यकतेनुसार पुढील कालावधी वाढविणे आणि त्यांना द्यावयाचे मानधनाचे दर शासनाच्या मान्यतेने निश्चित करणे.

vii) आयुक्त, मानव विकास यांच्याकरिता एक आणि आयुक्तालयामध्ये काम करणा-या अधिकारी/कर्मचारी वर्गाच्या कार्यालयीन वापराकरिता एक अशी दोन वाहने भाड्याने घेणे.

viii) मानव विकास निर्देशांकाशी निगडीत सर्व प्रकारच्या केंद्र व राज्य शासनाच्या कार्यक्रमांची अंमलबजावणी मानव विकास निर्देशांक सुधारण्यासाठी निवडण्यात आलेल्या तालुक्यात प्राथम्याने करणे व अशा प्रकारची अंमलबजावणी केली जात नसेल तर संबंधित विभागास निर्देश देणे.

ix) मानव विकास आयुक्तालयाकरिता सर्व प्रकारची यंत्रसामुग्री, फर्निचर, लेखनसाहित्य मंजूर करण्याचे आणि त्यावर येणारा खर्च मिशनला उपलब्ध होणा-या आस्थापना निधीतून करण्याचे संपूर्ण अधिकार आयुक्तांना राहतील.

x) मानव विकास आयुक्तालयाच्या कामकाजास गती देण्याच्या दृष्टीने आयुक्त आपले काही अधिकार आयुक्तालयामधील निम्नस्तरीय अधिका-यांना प्रदान (Delegate)करू शकतील.

xi) मानव विकास आयुक्तालय काही तालुक्यांची निवड करुन तेथे राबविण्यात आलेल्या योजनां मध्ये झालेल्या फायद्यांचे संक्षिप्त मूल्यमापन करेल.

xii) आवश्कता भासल्यास मानव विकास आयुक्तालय जिल्हा आणि तालुका स्तरावरील राबविलेल्या योजनांची तपासणी व लेखा परिक्षण करतील.

मिशनचे आयुक्तांचा दर्जा व मानधन :-

७. मानव विकास आयुक्त हे शासनाने नियुक्त केलेले, शासन किंवा शासन सेवेतून निवृत्त झालेले सचिव श्रेणीतील किंवा तत्सम अधिकारी असतील. शासन सेवेतून निवृत्त झालेल्या अधिका-यांची आयुक्तपदी नियुक्ती केल्यास त्यांना शासनाच्या विहित नियमानुसार मानधन देण्यात येईल.

जिल्हा प्रशासन :-

८. i) कार्यक्रमाची अंमलबजावणी व सनियंत्रण करण्यासाठी जिल्हाधिकारी हे 'नियंत्रक' अधिकारी म्हणून काम पाहतील.

ii) कामाची अंमलबजावणी व संनियंत्रणासाठी जिल्हा स्तरावर खालीलप्रमाणे समिती राहिल :

जिल्हाधिकारी	- अध्यक्ष
मुख्य कार्यकारी अधिकारी (जि.प.)	- सह अध्यक्ष
संबंधित विभागांचे जिल्हा प्रमुख	- सदस्य
जिल्हा परिषदे अंतर्गत जिल्हा परिषदेने नामनियुक्त केलेला एक सभापती	- सदस्य
अशासकीय सेवाभावी संस्था (एक)	- सदस्य
अग्रणी बॅकेचे अधिकारी	- सदस्य
जिल्हा नियोजन अधिकारी	- सदस्य सचिव

iii) मानव विकास कार्यक्रमासाठी जिल्हाधिकारी स्तरावर अतिरिक्त कर्मचारीवृंद उपलब्ध करून देण्याची आवश्यकता लक्षात घेऊन संदर्भाधीन शासन निर्णयानुसार जिल्हाधिकारी स्तरावर निर्माण करण्यात आलेल्या पदांची पुनर्रचना करुन, संबंधित जिल्हयांत खालीलप्रमाणे नविन पदे निर्माण करण्यात येत आहेत :-

अ) विस्तार अधिकारी (पंचायत) / सहाय्यक जिल्हा नियोजन अधिकारी	- १
ब) संशोधन सहाय्यक	- १
क) सांख्यिकी सहाय्यक	-१

iv) उपरोक्त पदांसाठी नियमित कर्मचारी उपलब्ध होईपर्यंत जिल्हाधिकारी यांनी सदरची पदे कंत्राटी पध्दतीने भरावीत. सदर पदांसाठी शैक्षणिक अर्हता समकक्ष पदाप्रमाणे राहील. कंत्राटी पध्दतीने भरावयाच्या कर्मचा-यांचे मानधन व अनुषंगिक भत्ते शासन स्तरावरून निश्चित करून कळविण्यात येईल.

v) जिल्ह्यांतर्गत गठित करण्यात आलेल्या मानव विकास समित्यांचे कार्यालयाकरिता लागणारी सर्व प्रकारची यंत्रसामुग्री, फर्निचर, लेखनसाहित्य मंजूर करण्याचे आणि त्यावर येणारा खर्च उपलब्ध होणा-या आस्थापना निधीतून करण्याचे संपूर्ण अधिकार जिल्हाधिकारी यांना राहतील.

तालुका प्रशासन :-

९. i) तालुका स्तरावर कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी गटविकास अधिकारी यांची राहिल.

ii) कार्यक्रमाच्या अंमलबजावणी व सनियंत्रणासाठी त्यांचे अध्यक्षतेखाली खालीलप्रमाणे तालुका स्तरीय समिती राहील :-

गट विकास अधिकारी	- अध्यक्ष
तहसीलदार किंवा तहसिलदारांनी नामनिर्देशित केलेला नायब तहसिलदार	- निमंत्रित सदस्य
बालविकास प्रकल्प अधिकारी	- सदस्य
गट शिक्षणाधिकारी	- सदस्य
तालुका आरोग्य अधिकारी	- सदस्य
अशासकीय सेवाभावी संस्था (एक)	- सदस्य
पंचायत समितीने नामनियुक्त केलेला सभासद(एक)	- सदस्य
विस्तार अधिकारी (पंचायत)	- सदस्य सचिव

तंत्र सल्लागार संस्थांची नियुक्ती व कार्ये :-

१०. गटविकास अधिकारी स्तरावर कार्यक्रमाची अंमलबजावणी व सनियंत्रण करण्याकरिता व्यवसायिक तज्ञांची आवश्यकता विचारात घेता, मागास क्षेत्र अनुदान निधीच्या (BRGF) धर्तीवर कंत्राटी पध्दतीने, वैयक्तिक निवडीद्वारे अथवा व्यवसायिक संस्थांमार्फत आऊटसोर्सिंग पध्दतीने सेवा उपलब्ध करून घेण्यात येईल. या योजनेअंतर्गत अभियंता, लेखापाल, संगणक माहिती नोंदणीकार, समाज प्रवर्तक इत्यादी स्वरुपाचे तंत्रज्ञ आवश्यकतेनुसार तालुका स्तरावर कंत्राटी पध्दतीने घेता येतील. जिल्ह्यातील तालुक्यांसाठी नियुक्त करावयाच्या तज्ञांची नियुक्ती व मानधन ग्राम विकास विभाग़ाने वेळोवेळी विहित केलेल्या शासन निर्णयानुसार असेल.

योजनांना /कामांना प्रशासकीय मान्यता :-

११. योजनेच्या तपशिलामध्ये प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार नमुद करण्यात आलेले आहेत, परंतु योजनेची अंदाजपत्रकीय किंमत लक्षात घेवून रुपये ३ लाखापर्यंतच्या योजनांना/कामांना प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार गटविकास अधिकारी यांना राहतील व त्यावरील रकमेस प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांना असतील. प्रशासकीय

मान्यता देताना गटविकास अधिकारी व जिल्हाधिकारी यांनी शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या निकषांचे / आदेशांचे पालन करावे.

योजनांना /कामांना तांत्रिक मान्यता :-

१२. मानव विकास कार्यक्रमांतर्गतच्या योजना/कामांना तांत्रिक मान्यता देण्याचे अधिकार योजनेच्या माहितीमध्ये विहित केलेल्या अधिका-यांना असतील. याबाबत काही शंका असल्यास, त्यांनी त्या आयुक्त, मानव विकास यांचेमार्फत शासनाच्या निदर्शनास आणून त्यावर शासनाचे लेखी आदेश प्राप्त करून घ्यावेत.

निविदा व खरेदी प्रक्रीया :-

१३. i) निविदा मागविणे / स्वीकृत करणे व खरेदीबाबतचे सर्व निकष शासनाच्या संबंधित विभागाने विहित केल्याप्रमाणे राहतील.

ii) तालुक्यांकरिता खरेदी करावयाच्या शाळा बसकरिता आवश्यक असणारी निविदा प्रक्रीया शासनाने निर्धारित केलेल्या निकषानुसार राज्य परिवहन महामंडळाकडून केली जाईल. यासाठी लागणा-या निधीची मागणी महामंडळाने आयुक्त, मानव विकास यांचेकडे करावी.

वित्तीय बाबी

१४. i) या कार्यक्रमासाठी आवर्ती व अनावर्ती खर्चासाठी वित्तीय तरतूद नियोजन विभागाकडून करण्यात येईल.

ii) मानव विकास आयुक्तालयाच्या कार्यालयीन खर्चाकरिता शासनाकडून प्राप्त झालेला निधी " आयुक्त, मानव विकास " या नावाने राष्ट्रीयकृत बॅकेत स्वतंत्र खाते उघडून, त्या खात्यात जमा केला जाईल. हे बॅक खाते रु.१०,०००/- पर्यंत रकमेसाठी मानव विकास आयुक्तालयाचे आयुक्त/ उपआयुक्त, मानव विकास यापैकी एकाच्या स्वाक्षरीने व त्यापेक्षा जास्त रकमेसाठी मानव विकास आयुक्तालयाचे आयुक्त/ उपआयुक्त, मानव विकास यांच्या संयुक्त स्वाक्षरीने हाताळण्यात येईल.

iii) सदर निधी शासनाकडून जिल्हाधिकारी यांना विहित पध्दतीने वितरित करण्यात येईल. त्यांनी तो संबंधित गटाविकास अधिका-यांना कामांच्या मंजूरीनुसार वितरित करावा. गटविकास अधिकारी यांनी सदरचा निधी स्वतंत्र बॅक खात्यामध्ये ठेवून संबंधित कार्यान्वयीन यंत्रणास कामाच्या / योजनांच्या प्रगतीनुसार वितरीत करावा.

ii) तालुका स्तरावरील मासिक खर्चाची विवरणपत्रे गटविकास अधिकारी यांचेकडून प्राप्त करून ती शासनास दरमहा सादर करण्याची जबाबदारी आयुक्त, मानव विकास यांची राहील.

iii) अखर्चित निधीचे पुनर्विनियोजन करणे / समर्पित करण्यासाठी आवश्यक तो प्रस्ताव शासनास सादर करण्याची जबाबदारी जिल्हाधिकारी यांची राहिल.

१५. मानव विकास कार्यक्रमांतर्गत निधी वितरण किंवा अन्य धोरणात्मक बाबींसंदर्भातील कार्यवाही नियोजन विभागामार्फत करण्यात येईल. तथापि, वरील बाबी वगळता, विधानमंडळ विषयक सर्व बाबी, तसेच योजना राबविताना क्षेत्रीय यंत्रणेकडून यामध्ये काही अनियमितता वा गैरव्यवहार झाल्याचे आढळून आल्यास त्या अनुषंगाने करावयाची पुढील कार्यवाही संबंधित प्रशासकीय विभागाने करावयाची आहे.

१६. सदरचा शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने व त्या विभागाचा अनौपचारिक संदर्भ क्र. २७०/११/व्यय-८, दिनांक १९ जुलै, २०११ अन्वये निर्गमित करण्यात येत आहेत.

१७. हा शासन निर्णय शासनाच्या संकेत स्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक संकेतांक **२०११०७१९१२२४२८००१** असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

19/7/11

(सीताराम कुंटे)
शासनाचे प्रधान सचिव

प्रति,

१)मा.राज्यपालंचे सचिव
२)मा.मुख्यमंत्री यांचे सचिव
३) मा.उपमुख्यमंत्री यांचे सचिव
४) मा. मंत्री/राज्यमंत्री , यांचे खाजगी सचिव,
५)मा.कार्यकारी अध्यक्ष, राज्य नियोजन मंडळ, नवीन प्रशासकीय भवन, १८ वा मजला, मंत्रालयासमोर, मुंबई-३२
६) महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई,
७) महालेखापाल-२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, नागपूर,
८) महालेखापाल-१ (लेखापरीक्षा), महाराष्ट्र, मुंबई,
९) महालेखापाल-२ (लेखापरीक्षा), महाराष्ट्र, नागपूर,
१०) शासनाचे मुख्य सचिव,
११) शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,
१२) महासंचालक,यशदा,पुणे
१३) सदस्य सचिव ,उर्वरीत वैधानिक विकास मंडळ,नवीन प्रशासकीय भवन,१८ वा मजला,मंत्रालयासमोर,मुंबई-३२
१४) सदस्य सचिव ,मराठवाडा वैधानिक विकास मंडळ,नवीन प्रशासकीय इमारत,तळ मजला,औरंगाबाद
१५) सदस्य सचिव ,विदर्भ वैधानिक विकास मंडळ,B-२३/१,साऊथ अंबाजरी मार्ग ,अंध विद्यालयाजवळ,नागपूर

१६) आयुक्त ,मानव विकास आयुक्तालय,बाबा पेट्रोलपंपजवळ,अदालत रोड, औरंगाबाद
१७) विभागीय आयुक्त , (सर्व)
१८) जिल्हाधिकारी , (सर्व)
१९) मुख्य कार्यकारी अधिकारी ,(सर्व)
२०) संचालक ,अर्थ व सांख्यिकी संचालनालय
२१) संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र शासन, मुंबई.
२२) अधिदान व लेखा अधिकारी, महाराष्ट्र शासन, मुंबई.
२३) उपायुक्त, नियोजन, विभागीय आयुक्त कार्यालय,(सर्व)
२४) जिल्हा नियोजन अधिकारी ,(सर्व)
२५) गट विकास अधिकारी, पंचायत समिती, (सर्व)
२६) संचालक, रेशीम, नागपूर
२७) संचालक, आरोग्य,
२८) संचालक, शिक्षण
२९) संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण
३०) आयुक्त, कृषी
३१) प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, (सर्व)
३२) जिल्हा कोषागार अधिकारी ,(सर्व)
३३) मंत्रालयीन प्रशासकीय विभाग , (सर्व)
३४)नियोजन विभागातील सर्व सह सचिव/उपसचिव
३५) निवड नस्ती (का.१४१८), नियोजन विभाग

विवरणपत्र १
मानव विकास कार्यक्रमात समाविष्ट १२५ तालुक्यांची यादी

अ.क्र.	जिल्ह्याचे नाव	अ.क्र.	तालुक्याचे नाव
१	ठाणे(८)	१	जव्हार
		२	विक्रमगड
		३	तलासरी
		४	डहाणू
		५	मोखाडा
		६	वाडा
		७	मुरबाड
		८	शहापूर
२	रायगड(१)	९	सुधागड
३	सिंधुदुर्ग(१)	१०	वैभववाडी
४	नाशिक(८)	११	सुरगणा
		१२	त्र्यंबकेश्वर
		१३	पेठ
		१४	इगतपुरी
		१५	कळवण
		१६	दिंडोरी
		१७	बागलाण
		१८	नांदगाव
५	धुळे(४)	१९	शिरपूर
		२०	साक्री
		२१	धुळे
		२२	सिंदखेडा
६	नंदूरबार(६)	२३	अक्कलकुआ
		२४	अक्राणी
		२५	तळोदा
		२६	नवापूर
		२७	नंदूरबार
		२८	शहादा
७	जळगाव(७)	२९	चाळीसगाव
		३०	चोपडा
		३१	जामनेर
		३२	बोदवड
		३३	मुक्ताईनगर

		३४	अंमळनेर
		३५	एरंडोल
८	जालना (८)	३६	परतूर
		३७	बदनापूर
		३८	जालना
		३९	घनसावंगी
		४०	अंबड
		४१	भोकरदन
		४२	मंठा
		४३	जाफ्राबाद
९	परभणी (९)	४४	मानवत
		४५	सेलू
		४६	पाथरी
		४७	जिंतूर
		४८	परभणी
		४९	पूर्णा
		५०	गंगाखेड
		५१	सोनपेठ
		५२	पालम
१०	हिंगोली (३)	५३	हिंगोली
		५४	सेनगाव
		५५	औढा नागनाथ
११	बीड (१)	५६	वडवणी
१२	नांदेड (९)	५७	उमरी
		५८	धर्माबाद
		५९	हिमायतनगर
		६०	बिलोली
		६१	मुदखेड
		६२	किनवट
		६३	देगलूर
		६४	लोहा
		६५	भोकर
१३	बुलढाणा (७)	६६	लोणार
		६७	सिंदखेड राजा
		६८	जळगाव जामोद
		६९	चिखली
		७०	देऊळगाव राजा

		७१	मेहकर
		७२	संग्रामपूर
१४	अकोला (१)	७३	पातूर
१५	वाशिम (४)	७४	मालेगाव
		७५	रिसोड
		७६	मानोरा
		७७	वाशिम
१६	अमरावती (२)	७८	चिखलदरा
		७९	धारणी
१७	यवतमाळ (९)	८०	पुसद
		८१	झरी जामणी
		८२	उमरखेड
		८३	आर्णी
		८४	महागाव
		८५	घाटंजी
		८६	केऴापूर
		८७	मारेगाव
		८८	कळंब
१८	नागपूर (२)	८९	काटोल
		९०	रामटेक
१९	भंडारा (५)	९१	लाखांदूर
		९२	मोहाडी
		९३	तुमसर
		९४	लाखनी
		९५	साकोली
२०	गोंदिया (८)	९६	सालेकसा
		९७	देवरी
		९८	सडक - अर्जुनी
		९९	गोरेगाव
		१००	गोंदिया
		१०१	अर्जुनी - मोरगाव
		१०२	तिरोडा
		१०३	आमगाव
२१	चंद्रपूर (११)	१०४	जिवती
		१०५	सावली
		१०६	पोंभूर्णा
		१०७	गोंडपिंपरी

		१०८	मूल
		१०९	नागभीड
		११०	शिंदेवाही
		१११	वरोरा
		११२	ब्रम्हपूरी
		११३	चिमूर
		११४	राजूरा
२२	गडचिरोली (११)	११५	भामरागड
		११६	सिरोंचा
		११७	अहेरी
		११८	गडचिरोली
		११९	कोरची
		१२०	धानोरा
		१२१	कुरखेडा
		१२२	एटापल्ली
		१२३	मूलचेरा
		१२४	चामोर्शी
		१२५	आरमोरी

विवरणपत्र २
योजनांची यादी
I) शिक्षण

अ.क्र.	मानव विकास कार्यक्रमातून घ्यावयाच्या योजनांची यादी
१	इयत्ता १० वी आणि १२ वी मध्ये अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांकरिता विशेष शिकवणी वर्ग सुरु करणे
२	मोठ्या गावातील माध्यमिक शाळात अभ्यासिका सुरु करण्यासाठी सोलार लाईट व फर्निचर / पुस्तके पुरविणे
३	ग्रामींण भागातील सर्वच मुलींना इ. १२ वी पर्यंत शिक्षण घेणे शक्य व्हावे याकरिता गाव ते शाळा यादरम्यान वाहतूकीची सुविधा उपलब्ध करून देणे.
४	माध्यमिक / उच्च माध्यमिक शासकीय / अनुदानित शाळांमध्ये प्रयोगशाळांकरिता साहित्य पुरविणे
५	तालुक्याच्या ठिकाणी बालभवन - विज्ञान केंद्र स्थापन करणे
६	कस्तुरबा गांधी बालिका योजनेची व्याप्ती इयत्ता १० वी पर्यंत वाढविणे

II) आरोग्य व बालकल्याण

अ.क्र.	मानव विकास कार्यक्रमातून घ्यावयाच्या योजनांची यादी
१	तज्ञ महिला डॉक्टरकडून गर्भवती महिलांची आरोग्य तपासणी करणे तसेच ० ते ६ महिने वयोगटातील बालकांची व मातांची तपासणी करणे आणि औषधोपचार करणे.
२	किशोरवयीन मुलींना आरोग्यविषयक बाबी व व्यवसाय कौशल्य विकसित करण्याबाबत प्रशिक्षण देणे
३	अ.जा/अ.ज./दारिद्रय रेषेखालील बाळंत महिलेला बुडीत मजूरी देणे.

III) उत्पन्नवाढीच्या योजना

अ.क्र.	मानव विकास कार्यक्रमातून घ्यावयाच्या योजनांची यादी
१	रेशीम कोष विकसित करण्याकरिता किटक संगोपन गृह बांधणे
२	फिरती माती परीक्षण प्रयोगशाळा सुरु करणे
३	ग्रामीण भागातील युवकांना स्वयंरोजगाराकरिता व्यवसाय कौशल्याचे प्रशिक्षण देणे
४	स्वयंसहायता बचत गटाच्या माध्यमातून परसबाग / किचन गार्डन योजना राबविणे

शिक्षण

१. योजनेचे नांव : इयत्ता १० वी व १२ वी मध्ये अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांकरिता विशेष शिकवणी वर्ग सुरु करणे.

योजनेचा ढोबळ तपशील:

१.१ हा कार्यक्रम तालुक्यातील सर्वच माध्यमिक व तालुक्यातील २ उच्च माध्यमिक शाळांमध्ये राबविण्यात यावा.

१.२ हा कार्यक्रम ३ महिने कालावधीचा असेल. एका वर्गात कमीत कमी २५ विद्यार्थी असावेत.

१.३ इयत्ता १० वी साठी इंग्रजी, गणित आणि शास्त्र या तीन विषयाचे शिकवणी वर्ग घेण्यात येतील तर इयत्ता १२ वी साठी शास्त्र शाखेत गणित, भौतिक शास्त्र, रसायनशास्त्र, जीवशास्त्र या विषयांचे, वाणिज्य शाखेत अकाऊंटस व कला शाखेत इंग्रजी या विषयांचे उजळणी प्रशिक्षण देण्यात येईल.

१.४ प्रत्येक विषयाच्या शिक्षकास ३ महिन्यांकरिता एकत्रित मानधन दिले जाईल. इयत्ता १० वी करिता (६००० x ३ = १८०००) व इयत्ता १२ वी करिता (८००० x ६ = ४८०००) या दराने मानधन देण्यात यावे.

१.५ हे विशेष उजळणी वर्ग शक्यतो संबंधित शाळा / महाविद्यालयामध्येच घेतले जावेत.

१.६ शाळेतील एका शिक्षकाची ''समन्वयक'' म्हणून नियुक्ती केली जाईल व त्यास पूर्ण कालावधीकरिता रु. २०००/- इतके मानधन देण्यात यावे.

१.७ या कार्यक्रमावर आवश्यकतेनुसार रु. ७०००/- पर्यंत इतर खर्च कर ण्यात यावा.

१.८ या कार्यक्रमास शिक्षणाधिकारी माध्यमिक हे तांत्रिक मान्यता देतील व जिल्हाधिकारी हे प्रशासकीय मंजूरी प्रदान करतील.

कालावधी :

बोर्डाच्या परीक्षेचा निकाल लागल्यानंतर साधारणत: जून ते सप्टेंबर या कालावधीमध्ये हा कार्यक्रम राबविला जावा.

कार्यान्वयीन यंत्रणा :

तांत्रिक मान्यता प्रदान करणारी यंत्रणा ही या कार्यक्रमाचे संनियंत्रण करेल.

--------*-------

२. <u>योजनेचे नांव</u> : <u>तालुक्यातील काही मोठया गावांमध्ये "अभ्यासिका" सुरु करणे.

<u>योजनेचा ढोबळ तपशील:</u>

१.१ या कार्यक्रमाअंतर्गत तालुक्यातील काही मोठया गावामध्ये विशेषत: ज्या गावामध्ये माध्यमिक किंवा उच्च माध्यमिक शाळा आहेत, अशा ठिकाणी **कमाल २५** अभ्यासिका सुरु करण्यात याव्यात.

१.२ ग्रामीण भागात निवासी घरे फार लहान असल्यामुळे तसेच घरामध्ये अभ्यासास पोषक वातावरण नसल्यामुळे विद्यार्थ्यांना योग्य प्रकारे अभ्यास करता येत नाही. ग्रामीण भागात लोडशेडींगची समस्यासुध्दा गंभीर आहे. ही परिस्थिती विचारात घेता काही मोठया गावामध्ये अभ्यासिका सुरु करणे गरजेचे आहे.

१.३ अभ्यासिका शक्यतो माध्यमिक शाळेच्या १-२ खोल्यांमध्ये सुरु करण्यात यावी.

१.४ ग्रामीण भागातील लोडशेडींगची समस्या विचारात घेता या अभ्यासिकेमध्ये सोलार लाईटची व्यवस्था करण्यात यावी.

१.५ अभ्यासिका शक्यतो ८ वी ते १२ वी मुलांसाठी असावी, त्यामध्ये इयत्ता ८ वी ते १२ वी पर्यंतच्या अभ्यासक्रमासंबंधातील पुस्तके सुध्दा उपलब्ध करुन दिली जावीत. साधारणत: प्रत्येक इयत्तेकरिता प्रत्येक पुस्तकाच्या ८ ते १० प्रती विकत घेण्यात याव्यात. ही सर्व पुस्तके व्यवस्थित ठेवण्याचीसुध्दा व्यवस्था करण्यात यावी.

१.६ अभ्यासिकेचे कामकाज व्यवस्थित चालविण्याकरिता एका शिक्षकाची "**<u>व्यवस्थापक</u>**" म्हणून नियुक्ती करण्यात यावी. तसेच शाळेतील एका सेवकाची सेवक म्हणून नियुक्ती करण्यात यावी.

१.७ **<u>व्यवस्थापक</u>** आणि **<u>सेवक</u>** यांना दरमहा अनुक्रमे रु. **<u>५००</u>** व रु. **<u>३००</u>** इतके मानधन देण्यात यावे.

१.८ ही अभ्यासिका दररोज साधारणत: सायंकाळी ७ ते १० या वेळेत चालविण्यात यावी.

१.९ अभ्यासिकेतील पुस्तके फक्त अभ्यासिकेमध्ये वाचण्याकरिता देण्यात यावीत. ती घरी नेण्याकरिता देण्यात येवू नयेत.

<u>मान्यता</u> : शिक्षणाधिकारी (माध्यमिक) हे या उपक्रमास तांत्रिक मान्यता प्रदान करतील जिल्हाधिकारी हे प्रशासकीय मंजूरी देतील.

<u>कालावधी</u> ही अभ्यासिका साधारणत: **<u>जुलै ते मार्च</u>** या कालावधीत सुरु ठेवण्यात यावी.

<u>अपेक्षित खर्च</u> : प्रत्येक अभ्यासिकेकरिता साधारणत: रु. ६० हजार इतका खर्च अपेक्षित आहे. या खर्चाची ढोबळमानाने विभागणी खालीलप्रमाणे असेल:-

अ) मानधनावरील वार्षिक खर्च : रु. ७०००/-

ब) पुस्तकांच्या खरेदीवरील खर्च : रु. २००००/-

क) सोलर लाईट ची व्यवस्था करणेकरिता येणारा खर्च : रु. ३००००/-

ड) इतर किरकोळ वार्षिक खर्च : रु. ३०००/-

<u>कार्यान्वयीन यंत्रणा</u> :

तांत्रिक मान्यता प्रदान करणारी यंत्रणा ही या कार्यक्रमाचे संनियंत्रण करेल.

--------*-------

३. **<u>योजनेचे नांव</u>** : **ग्रामीण भागातील सर्वच मुलींना इयत्ता १२ वी पर्यंत शिक्षण घेणे शक्य व्हावे याकरिता गाव ते शाळा या दरम्यान वाहतुकीची सुविधा उपलब्ध करुन देणे.**

<u>योजनेचे स्वरुप :</u>

१.१ जवळ जवळ सर्वच तालुक्यांमध्ये १० ते १५ गावांकरिता एक माध्यमिक किंवा उच्च माध्यमिक शाळा आहे. या शाळेपासून वेगवेगळया गावांचे अंतर साधारणतः ३ ते १५ कि.मी. इतके आहे. सर्वच गावांना एस.टी. वाहतुकीची सुविधा उपलब्ध नाही. ग्रामीण भागातील बऱ्याचशा मुली ८ वी नंतरचे शिक्षण घेवू शकत नाही. सर्व मुलींना इयत्ता १२ वी पर्यंतचे शिक्षण देणे अत्यंत गरजेचे आहे. असे झाल्यास, बालविवाहाचा प्रश्न आपोआप संपुष्टात येईल. तसेच कुपोषित बालकाचा प्रश्नसुध्दा काही प्रमाणात कमी होईल.

<u>वाहतुकीची व्यवस्था खालीलप्रमाणे करण्यात येईल</u>.

शासनमान्य माध्यमिक शाळेच्या वेळापत्रकानुसार मुलींकरिता मोफत वाहतूक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी राज्य परिवहन महामंडळास बस विकत घेण्याकरिता शासनामार्फत अनुदान उपलब्ध करुन देणे. मुलींच्या वाहतूक सुविधेव्यतिरिक्त इतर वेळेत सदर बसचा वापर प्रवासी सुविधेकरिता राज्य परिवहन महामंडळ करू शकेल. एस.टी महामंडळाच्या कर्मचा-यांचे वेतन व भत्ते, बसच्या देखभाल, दुरुस्तीवरील खर्च तसेच प्रत्यक्ष वाहतुकीची व्यवस्था संबंधित राज्य परिवहन महामंडळामार्फत करण्यात यावी. राज्य परिवहन महामंडळ, मुलांच्या पालकांकडून काही प्रमाणात वाहतूक भाडे आकारू शकेल. प्रति कि.मी. भाड्याचा दर शालेय शिक्षण विभागाकडून ठरविण्यात येईल. शाळेच्या कार्यक्षेत्रात येणा-या सर्वच गावातून सर्व मुलींना शाळेमध्ये आणण्याची जबाबदारी पूर्णतः शाळा व्यवस्थापनाची असेल. बसची मालकी राज्य परिवहन महामंडळाकडे राहील व विहित विमा रक्कम व पथकर भरण्याची जबाबदारी राज्य परिवहन महामंडळाची राहील. बसचा रंग आणि त्यावरील घोषवाक्य शालेय शिक्षण विभागाकडून कळविण्यात येईल.

<u>मान्यता</u> :

१२५ तालुक्यांकरिता खरेदी करावयाच्या शाळा बसकरिता आवश्यक असणारी तांत्रिक मान्यता व निविदा प्रक्रीया शासनाने निर्धारित केलेल्या निकषानुसार राज्य परिवहन महामंडळाकडून करण्यात येईल. लागणा-या निधीची मागणी महामंडळाने मानव विकास मिशनकडे करावी.

कार्यान्वयीन यंत्रणा :तांत्रिक मान्यता प्रदान करणारी यंत्रणा या कार्यक्रमाचे संनियंत्रण करेल.

<u>अपेक्षित खर्च</u> :

प्रत्येक तालुक्यासाठी ५ बस उपलब्ध करून दिल्या जातील. याप्रमाणे राज्यातील १२५ तालुक्यासाठी ६२५ बसेस चालवाव्या लागणार आहेत. शालेय विद्यार्थीनींकरिता एकूण दोन परतीच्या फे-या कराव्या लागणार आहेत. मार्गाचे सरासरी अंतर २५ कि.मी. धरल्यास एका बसच्या चार फे-यांचे दैनिक १०० कि.मी. अंतर होईल. शालेय सुट्ट्या वगळून सर्वसाधारणपणे २१५ दिवसांकरिता प्रति वर्षी प्रति बस आवर्ती खर्च रु.५.१० लक्ष महामंडळास प्रतिपूर्ती म्हणून देय राहिल.

तालुकास्तरावर गटविकास अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात येईल. या समितीत गटशिक्षण अधिकारी, तालुक्याचा एसटी डेपो मॅनेजर, शाळांचे मुख्याध्यापक असतील. सदर समिती शाळा दुर्गमतेचा विचार करून मार्ग निश्चिती करतील व याबाबतचा अंतिम निर्णय जिल्हाधिकारी घेतील.

बसचे व्यवस्थापन व इंधन यासाठी उपलब्ध निधीतून खर्च न भागल्यास आवश्यकतेनुसार अतिरिक्त अनुदान मंजूर करण्याचे अधिकार शासनास राहतील. विद्यार्थ्यामागे काही प्रमाणात शुल्क लावल्यास कार्यक्रमासाठी अतिरिक्त निधी उपलब्ध करून घेता येईल. राज्य परिवहन महामंडळास ६२५ बस खरेदी कराव्या लागणार आहेत. यासाठी प्रति बस १४.५० लक्ष याप्रमाणे प्रथम वर्षी एकूण रु. ९०.६२ कोटी अनावर्ती खर्च अपेक्षित आहे.

--------*-------

४. योजनेचे नांव : **शासकीय तसेच अनुदानित माध्यमिक उच्च माध्यमिक शाळांमध्ये प्रयोगशाळेकरिता आवश्यक साहित्य पुरविणे.**

योजनेचे स्वरुप :.

१.१ ग्रामीण भागातील बहुतेक माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमध्ये असणा-या प्रयोगशाळा अद्यावत नाहीत. ग्रामीण भागातील बहुतेक विद्यार्थी विज्ञान या विषयामध्ये कच्चे असतात. ही परिस्थिती विचारात घेता ग्रामीण भागातील शासकीय, जिल्हा परिषद व अनुदानीत खाजगी माध्यमिक शाळांमधील प्रयोगशाळा अद्यावत करणे गरजेचे आहे.

१.२ प्रयोगशाळा साहित्य खरेदी करण्यासाठी जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली तज्ज्ञ शिक्षकाची समिती गठीत करण्यात यावी व त्या समितीच्या माध्यमातून आवश्यक साहित्याची खरेदी करण्यात यावी.

मान्यता :

या कार्यक्रमास शिक्षणाधिकारी (माध्यमिक) हे तांत्रिक मान्यता देतील व जिल्हयाचे जिल्हाधिकारी हे प्रशासकीय मान्यता प्रदान करतील.

अपेक्षित खर्च- प्रत्येक शाळेकरिता NCERT च्या निकषानुसार रु.२५००० एवढा अनावर्ती खर्च अपेक्षित राहिल.

प्रत्येक तालुक्याकरिता अपेक्षित खर्च :

प्रत्येक तालुक्यात साधारणत: ५० माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांना प्रयोगशाळा साहित्य देण्याचे गृहित धरल्यास, प्रत्येक तालुक्यास साधारणत: रु. १२.५० लक्ष इतका खर्च अपेक्षित आहे.

हा संपूर्ण खर्च "**एक वेळचा खर्च**" असल्यामुळे त्यावर दरवर्षी खर्च करावा लागणार नाही. ज्या माध्यमिक शाळांमध्ये इमारतीची सुविधा आहे अशाच शाळांमध्ये हा खर्च केला येईल. या कार्यक्रमाअंतर्गत इमारती बांधण्यावर किंवा इमारती दुरुस्तीवर खर्च करता येणार नाही.

कार्यान्वयीन यंत्रणा :

तांत्रिक मान्यता प्रदान करणारी यंत्रणा ही या कार्यक्रमाचे संनियंत्रण करेल.

--------*-------

५. योजनेचे नांव : **तालुक्याच्या ठिकाणी बालभवन-विज्ञान केंद्र स्थापन करणे**.

योजनेचा उद्येश :

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये विज्ञान विषयाबाबत रुची निर्माण करणे.

योजनेचे स्वरुप :.

१.१ सद्यःस्थितीत राज्यातील कोणत्याही तालुक्याच्या ठिकाणी बालभवन-विज्ञान केंद्र कार्यरत नाही.

१.२ बालभवन-विज्ञानकेंद्र स्थापन करण्याची जबाबदारी तालुक्याच्या ठिकाणी कार्यरत असलेल्या उच्च माध्यमिक शाळेकडे सोपविण्यात यावी.

१.३ या कार्यक्रमाअंतर्गत कोणत्याही प्रकारचे बांधकाम केले जाणार नाही. या कार्यक्रमाअंतर्गत फक्त वैज्ञानिक उपकरणांचा पुरवठा केला जाईल तसेच अशा प्रकारचे वैज्ञानिक उपकरणे व्यवस्थित ठेवण्याकरिता येणारा खर्चही या कार्यक्रमाच्या माध्यमातून करण्यात यावा.

१.४ वैज्ञानिक उपकरणांची खरेदी करण्याकरिता जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली **तज्ज्ञ शिक्षकाची** एक समिती गठीत केली जाईल आणि त्या समितीच्या माध्यमातून या संपूर्ण कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यात यावी.

१.५ बालभवन-विज्ञानकेंद्र स्थापन करण्याकरिता आवश्यक इमारत जिल्हापरिषद किंवा संबंधित माध्यमिक शाळेला उपलब्ध करुन द्यावी.

१.६ बालभवन-विज्ञान केंद्र चालविण्याची तसेच केंद्राची देखभाल करण्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित माध्यमिक शाळेची राहील.

१.७ बालभवन-विज्ञान केंद्र योग्य प्रकारे चालते किंवा नाही यावर जिल्हाधिका-यांचे नियंत्रण राहील.

१.८ केंद्र चालविण्याकरिता वार्षिक रु. १००००/- खर्च दिला जाईल. त्याव्यतिरिक्त होणारा खर्च संबंधित संस्थेने करणे आवश्यक आहे.

मान्यता :

या कार्यक्रमास शिक्षणाधिकारी (माध्यमिक) हे तांत्रिक मान्यता देतील व जिल्हयाचे जिल्हाधिकारी हे प्रशासकीय मान्यता प्रदान करतील.

अपेक्षित खर्च-

प्रत्येक तालुक्यात एकच केंद्र स्थापन करावयाचे असून बालभवन तसेच विज्ञान केंद्राकरिता आवश्यक वैज्ञानिक साहित्य खरेदी करण्याकरिता अंदाजे रु.१०.१० लक्ष इतका खर्च अपेक्षित राहिल.

कार्यान्वयीन यंत्रणा:

तांत्रिक मान्यता प्रदान करणारी यंत्रणा ही या कार्यक्रमाचे संनियंत्रण करेल.

--------*-------

६. योजनेचे नांव : कस्तुरबा गांधी बालिका योजनेची व्याप्ती इयत्ता १० वी पर्यंत वाढविणे.

योजनेचे स्वरुप :.

१.१ कस्तुरबा गांधी बालिका योजना राज्यात ३६ ठिकाणी राबविली जात आहे. ही संपूर्ण योजना केंद्र सरकारची असून ही योजना इयत्ता ८वी पावेतोच्या मुलींकरिता आहे. ही योजना अनुसूचित जाती/जमाती, इतर मागास वर्ग व अल्पसंख्याक समाजातील मुलींकरिताच लागू आहे. वसतीगृहात राहणा-या मुलींना इतर शासकीय शिष्यवृत्तीचा लाभ घेता येणार नाही.

१.२ मानव विकास कार्यक्रमाअंतर्गत निवड करण्यात आलेल्या तालुक्यांमध्ये ही योजना इयत्ता १० वी पर्यंत विस्तारीत करण्याबाबत निर्णय घेण्यात आलेला आहे. याकरिता कस्तुरबा गांधी बालिका विकास योजनांशी संलग्न तालुके इयत्ता ९ वी ते १० वी वर्ग सुरु करण्यासाठी दोन वर्गखोल्यांचे बांधकाम आणि चार शिक्षक मानधनावर नियुक्त करण्यात यावेत.

मान्यता :

या कार्यक्रमास शिक्षणाधिकारी (माध्यमिक) हे तांत्रिक मान्यता देतील व जिल्हयाचे जिल्हाधिकारी हे प्रशासकीय मान्यता प्रदान करतील.

अपेक्षित खर्च-

या योजनेची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीकोनातून प्रत्येक केंद्राकरिता खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित राहिल :-

अ) अनावर्ती खर्च : रु. ३० लक्ष. (बांधकाम- निवासाकरिता डॉर्मेटरी.)

ब) अनावर्ती खर्च : रु. १० लक्ष (दोन वर्गखोल्यांचे बांधकाम व बसण्याची व्यवस्था)

क) चार शिक्षकांचे मानधन : रु. १० लक्ष

ड) एका वसतीगृहात ५० मुलींच्या निवासाची व राहण्याची व्यवस्था राहील. प्रत्येक मुलीसाठी १५०० रु. प्रति महिना यानुसार १० महिन्यांसाठी रु. १५००० तर ५० मुलींसाठी रु. ७.५ लक्ष इतका खर्च अपेक्षित राहिल.

कार्यान्वयीन यंत्रणा:

तांत्रिक मान्यता प्रदान करणारी यंत्रणा ही या कार्यक्रमाचे संनियंत्रण करेल.

--------*-------

२. आरोग्य व बालकल्याण

१. योजनेचे नांव : तज्ञ महिला डॉक्टरकडून गर्भवती महिलांची आरोग्य तपासणी करणे तसेच ० ते ६ महिने वयोगटातील बालकांची व मातांची तपासणी करणे आणि औषधोपचार करणे.

योजनेचे स्वरुप :.

१.१ आरोग्य विभागाच्या नियमित कार्यक्रमाच्या अनुषंगाने पूरक कार्यक्रम म्हणून हा कार्यक्रम मानव विकास मिशनतर्फे यापूर्वीच काही तालुक्यांमध्ये राबविण्यात आला आहे. आता या कार्यक्रमाची व्याप्ती गरोदर महिलांपुरती न ठेवता ० ते ६ महिने वयोगटातील बालकांची ही तपासणी व औषधोपचार याचाही अंतर्भाव करण्यात येत आहे. त्यावर आधारित या कार्यक्रमाचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

१.२ सर्वसाधारणपणे एका प्राथमिक आरोग्य केंद्राच्या कार्यक्षेत्रात ६०० गरोदर महिला व २०० स्तनदा माता अपेक्षित आहेत. या कार्यक्रमाअंतर्गत १२५ तालुक्यातील सर्व गर्भवती महिलांची / बालकांची सखोल आरोग्य तपासणी दोन तज्ज्ञ महिला वैद्यकीय / एका बालरोगतज्ञ डॉक्टरकडून करण्यात यावी.

१.३ तपासणीचे कॅम्प्स प्राथमिक आरोग्य केंद्राच्या ठिकाणी आयोजित करण्यात यावेत. प्राथमिक आरोग्य केंद्रातील डॉक्टर व कर्मचा-यांच्या सेवा तसेच उपकरणाची सुविधा घेण्यात येईल. प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये प्रत्येक महिन्यात किमान चार कॅम्प्स आयोजित करण्यात यावेत.

१.४ प्राथमिक आरोग्य केंद्राच्या कार्यकक्षेत येणा-या गावातील गर्भवती महिला व ० ते ६ महिने वयोगटातील बालकांच्या मातांची प्राथमिक आरोग्य केंद्राच्या ठिकाणी आणण्याची व परत नेण्याची व्यवस्था शासनातर्फे करण्यात यावा. प्राथमिक आरोग्य केंद्राच्या ठिकाणी लाभार्थींना ने आण करण्याकरिता प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वाहनाचा शक्यतो वापर करण्यात यावा व त्यासाठी इंधन खर्च या कार्यक्रमातून करण्यात यावा. जेथे वाहन उपलब्ध नसेल त्या ठिकाणी प्रतिदिन रु. १५००/- याप्रमाणे आवश्यकतेनुसार एक ते दोन वाहने भाड्याने घेण्यात यावेत.

१.५ तज्ज्ञ महिला डॉक्टर व बालरोगतज्ञ यांना प्रत्येक दिवसाकरिता साधारणत: रु.१५०० इतके मानधन अदा करण्यात यावे. सदर मानधन ज्या दिवशी कॅम्प असेल त्यादिवसापुरतेच मर्यादित ठेवण्यात यावे. सर्व गर्भवती महिला व ० ते ६ महिने वयोगटातील बालकांच्या मातांची एक वेळ अल्पोपहार व्यवस्था प्राथमिक आरोग्य केंद्राच्या ठिकाणी तपासणीच्या दिवशी करण्यात यावी. यासाठी रु.३०००/- इतका खर्च अनुज्ञेय राहील. औषध व प्रयोगशाळा साहित्य यासाठी रु. २०००/- व पेंडाल व्यवस्था यासाठी रु. २०००/- इतका खर्च अपेक्षित राहिल.

१.६ प्रत्येक कॅम्प मध्ये साधारणत: ६० गरोदर महिलांची व ० ते ६ वयोगटातील बालकांची व आईची तपासणी करण्यात यावी. कुपोषणाच्या दृष्टीने ६ महिने ते २ वर्षांपर्यंतच्या मुलांची ३ महिन्यातून एकदा कॅम्पच्या दिवशी तपासणी करण्यात यावी.

१.७ अशा प्रकारे प्रत्येक कॅम्पकरिता अंदाजे रु.१४५०० इतका खर्च अपेक्षित राहिल. यामध्ये टेंट / पेंडाल, पिण्याचे पाणी, औषधे, प्रयोगशाळा व गर्भवती महिला व ० ते ६ महिने वयोगटातील बालकांच्या माता यांचा वाहतूक खर्च, तज्ञ डॉक्टरचे मानधन आणि जेवणाचा खर्च यांचा समावेश राहील. कॅम्प आयोजित करण्यासाठी जाहिरातीचा कुठलाही खर्च या कार्यक्रमांतर्गत अनुज्ञेय राहणार

नाही. कॅम्प आयोजनाबाबतची माहिती सर्व संबंधित ग्रामपंचयतींना, आरोग्य सेविका व अंगणवाडी सेविकांना देण्यात यावी.

१.८ याव्यतिरिक्त प्रत्येक तालुक्यासाठी दोन पोर्टेबल सोनोग्राफी मशिनसाठी प्रत्येकी रु. ५ लक्ष याप्रमाणे रु. १० लक्ष एकवेळ खर्च करण्यात यावा. मशीनचा ३ वर्षाचा देखभाल दुरुस्ती खर्चाचा यामध्ये अंतर्भावा राहील.

मान्यता :

या कार्यक्रमास जिल्हा आरोग्य अधिकारी हे तांत्रिक मान्यता देतील व जिल्हयाचे जिल्हाधिकारी हे प्रशासकीय मान्यता प्रदान करतील.

अपेक्षित खर्च-

प्रसुतीपूर्व कालावधीत मातेच्या ४ तपासण्या तसेच प्रसुतीपश्चात माता व अर्भकाच्या ६ तपासण्या अशा एकूण १० तपासण्या करण्यात याव्यात. म्हणजेच वर्षभरात ३६ लाख तपासण्या अपेक्षित राहतील. एका शिबिरामध्ये प्रसुतीपूर्व माता व ६ महिन्यापर्यंतची अर्भके व माता अशा एकूण ६० जणांच्या तपासण्या करण्यात याव्यात. अशा प्रत्येक शिबिरासाठी रु. १४५००/- खर्च अपेक्षित राहिल. त्याचप्रमाणे तपासणी योग्य व सखोल करता यावी या दृष्टीने प्रत्येक तालुक्यासाठी २ पोर्टेबल सोनोग्राफी मशीन उपलब्ध करून दिल्या जातील.

कार्यान्वयीन यंत्रणा:

जिल्हा परिषद आरोग्य विभागामार्फत व जिल्हाधिकारी यांच्या एकूण संनियंत्रणाखाली हा कार्यक्रम राबविण्यात येईल. संबंधित तालुक्याचे गटविकास अधिकारी प्राथमिक आरोग्य केंद्राला कॅम्प आयोजनासाठी निधी वितरित करतील व त्याचा हिशोब ठेवतील.

--------*-------

२. योजनेचे नांव : किशोरवयीन मुलींना आरोग्यविषयक बाबी व व्यवसाय कौशल्य विकसित करण्याबाबत प्रशिक्षण देणे

योजनेचे स्वरुप :.

१.१ या कार्यक्रमांतर्गत १२ ते १८ वयोगटातील किशोरवयीन मुलींना आरोग्यविषयक समस्यांबाबत तसेच जीवन कौशल्याशी निगडीत बाबीसंबंधात सविस्तर प्रशिक्षण देण्यात यावे.

१.२ किशोरवयीन मुलींना प्रशिक्षण देण्याकरिता गावातील एका महिलेची ''**प्रेरिका**'' म्हणून निवड करण्यात यावी.

१.३ हा कार्यक्रम महिला बचतगटामार्फत राबविला जाईल.

१.४ हा कार्यक्रम तालुक्यातील १००० पेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या सर्वच गावांमध्ये राबविण्यात यावा. कार्यक्रम राबविण्याचा कालावधी सहा महिने राहील.

१.५ गावातून एकच प्रेरिका निवडण्यात येईल.

१.६ सर्व प्रेरिकांना सविस्तर प्रशिक्षण तालुका स्तरावर देण्यात येईल.

१.७ हा कार्यक्रम शक्यतो दोन दिवस दररोज २-३ तासच राबविण्यात यावा.

१.८ या कार्यक्रमांतर्गत शाळेतील तसेच शाळाबाहय मुलींचाही समावेश करण्यात यावा.

१.९ प्रत्येक केंद्राचे ठिकाणी साधारणत: ३० ते ४० किशोरवयीन मुलींचा समावेश अपेक्षित राहील. प्रशिक्षणाचे ठिकाण शाळा असेल.

१.१० तालुक्यातील सर्वच गावांमध्ये हा कार्यक्रम राबविण्यात येईल.

१.११ या प्रशिक्षण कार्यक्रमात शिवणकला, एम्ब्रॉयडरी, डिटर्जंट पावडर तयार करणे, संगणक प्रशिक्षण, खाद्य पदार्थ तयार करणे यांचा समावेश असेल.

१.१२ आरोग्य योजनेत किशोरवयीन मुलींना विविध प्रशिक्षण देण्याबाबत केंद्र शासनाने नुकतीच " सबला " योजना घोषित केली आहे. या योजनेमध्ये महाराष्ट्रातील गोंदिया, गडचिरोली, नाशिक, अमरावती, नांदेड, बीड, नागपूर, बुलढाणा, सातारा, कोल्हापूर व मुंबई या ११ जिल्ह्यांचा समावेश करण्यात आला आहे. सबला योजनेखाली प्रशिक्षणावर १०० टक्के निधी केंद्र शासनाकडून प्राप्त होणार असल्यामुळे हे ११ जिल्हे मानव विकास मिशनच्या आरोग्य योजनेतून वगळण्यात यावेत.

मान्यता :

गटविकास अधिकारी हे या कार्यक्रमास तांत्रिक मान्यता देतील व जिल्हयाचे जिल्हाधिकारी हे प्रशासकीय मान्यता प्रदान करतील.

कार्यान्वयीन यंत्रणा:

तांत्रिक मान्यता प्रदान करणारी यंत्रणा ही या कार्यक्रमाचे संनियंत्रण करेल.

--------*-------

३. **योजनेचे नांव** : **अनु.जाति/अनु.जमाती/दारिद्रय रेषेखालील बाळंत महिलेला बुडीत मजूरी देणे.**

उद्येश :

बाळंत महिलांना आराम करणे आवश्यक असते. तथापि अ.जा./अ.ज./ दारिद्रय रेषेखालील कुटुंबातील महिलांना असे करणे शक्य होत नाही. त्यांना ताबडतोब कामावर जावे लागते. त्यामुळे त्या महिलांच्या प्रकृतिवर प्रतिकूल परिणाम होतो. ही बाब विचारात घेता ही योजना मानव विकास कार्यक्रमांतर्गत राबविणेबाबतचा निर्णय शासनाने घेतला आहे.

योजनेचा तपशील :

बाळंतपणानंतर महिलेची तसेच बाळाची विशेष काळजी घेणे जरूरीचे आहे. सध्याच्या प्रचलित निकषानुसार, अनु.जाति /अनु.जमाती /दारिद्रय रेषेखालील कुटुंबातील महिलांचे संस्थात्मक प्रसूती झाल्यास तिला रु. ७००/- इतके मानधन आरोग्य विभागाकडून दिले जाते. ग्रामीण भागातील महिला आर्थिक स्थितीमुळे मजूरीवर काम करण्यास बाहेर पडतात. त्यांना दिलासा म्हणून रु. ८००/- मानव विकास कार्यक्रमातून देण्यात यावे. अशी एकूण रक्कम रु.१५००/- गरोदरपणाचा ९ वा महिना सुरू होताच ही रक्कम संबंधिताच्या बॅक खात्यात जमा करण्यात यावी.

केंद्र पुरस्कृत नवीन "इंदिरा गांधी मातृत्व सहयोग योजना " घोषित करण्यात आली आहे. या योजने अंतर्गत भंडारा व अमरावती या दोन जिल्ह्यात सर्व गरोदर व बाळंत महिलांना रु. ४००० बुडीत मजुरी देण्यात येणार आहे. दुहेरी लाभ होणार नाही या दृष्टीने मानव विकास कार्यक्रमाच्या उपरोक्त योजनेतून हे दोन जिल्हे वगळण्यात यावेत. निवड झालेल्या लाभार्थ्यांची यादी ग्रामपंचायत कार्यालयाच्या सूचनाफलकावर प्रसिध्द करण्यात यावी.

मान्यता :- या कार्यक्रमासाठी जिल्हा आरोग्य अधिकारी तांत्रिक मान्यता देतील व संबंधित पंचायत समित्यांचे गटविकास अधिकारी हे प्रशासकीय मान्यता प्रदान करतील.

कार्यान्वयीन यंत्रणा:

तांत्रिक मान्यता प्रदान करणारी यंत्रणा ही या कार्यक्रमाचे संनियंत्रण करेल.

--------*-------

३. दरडोई उत्पन्न वाढविणे

१. योजनेचे नांव : रेशीम कोश विकसित करण्याकरिता कीटक संगोपनगृह बांधणे

योजनेचे स्वरुप :

१.१ रेशीम उद्योगामध्ये कोश तयार करण्याची प्रक्रिया अत्यंत महत्वाची आहे. याकरिता संगोपनगृहाचे बांधकाम करणे गरजेचे असते.

१.२ एक एकर तुतीच्या लागवडीकरिता संगोपनगृहाचे बांधकामास अंदाजे रु. १.५ लक्ष इतका खर्च अपेक्षित आहे.

१.३ या कार्यक्रमाअंतर्गत संबंधित शेतक-यास ५० टक्के परंतू जास्तीत जास्त रु. ५० हजार इतके अनुदान उपलब्ध करुन देण्यात यावे.

१.४ दरवर्षी हा कार्यक्रम फक्त प्रति तालुका २० शेतक-यांकरिताच मर्यादित ठेवण्यात यावा. लाभार्थी शेतक-याने किमान दोन ते तीन पिक दुबार जातीचे (BV) बेणे घेणे आवश्यक असून, लाभार्थ्याकडून ७-१२ चे उतारे, ८ अ चा नमुना घेण्यात यावा. तसेच लाभार्थ्याकडून ७ वर्षापर्यंत तुती लागवड करण्याबाबतचा करारनामा करून घेण्यात यावा. निवडलेल्या लाभार्थ्यांची नावे प्रसिध्दी माध्यमांकडून लोकांना कळेल अशी व्यवस्था करण्यात यावी. तसेच याची ठळक प्रसिध्दी ग्रामपंचायत कार्यालयाच्या सूचनाफलकावर करण्यात यावी.

मान्यता :

संचालक रेशीम उद्योग यांनी प्राधिकृत केलेले अधिकारी हे या प्रकल्पास तांत्रिक मंजूरी देतील व जिल्हाधिकारी हे प्रशासकीय मंजूरी देतील.

.

कार्यान्वयीन यंत्रणा :

तांत्रिक मान्यता प्रदान करणारी यंत्रणा ही या कार्यक्रमाची अंमलबजावणी करील.

--------*-------

२. **<u>योजनेचे नांव</u>** : **<u>फिरती माती परिक्षण प्रयोगशाळा सुरु करणे.</u>**

<u>उद्येश</u> : शेत जमिनीतील वेगवेगळया प्रकारच्या पोषणद्रव्याचे प्रमाण निश्चित करुन गरजेवर आधारित संतुलित प्रमाणात खतांचा वापर करण्यास प्रोत्साहन देणे.

<u>कार्यक्रमाचे स्वरुप</u> :

१.१ या कार्यक्रमांतर्गत फिरती माती परिक्षण प्रयोगशाळा सुरु करण्याकरिता वाहनाची खरेदी केली जाईल. वाहनाची मालकी जिल्हाधिकारी यांच्याकडे राहील व विहित विमा रक्कम व पथकर भरण्याची जबाबदारी बस वापरणा-या संस्थांची राहील.

१.२ या वाहनाचे खरेदी करिता संपूर्ण भांडवली खर्च मानव विकास कार्यक्रमाच्या निधीतून करण्यात यावा.

१.३ पहिल्या टप्प्यात प्रत्येक जिल्ह्याकरिता दोन फिरती प्रयोगशाळा सुरु करण्यात यावी. एखाद्या जिल्ह्यात या कार्यक्रमांतर्गत ३ वा ३ पेक्षा कमी तालुक्यांची निवड झाली असल्यास त्या जिल्ह्यात फक्त एकच फिरती माती परिक्षण प्रयोगशाळा सुरू करावी.

१.४ या फिरत्या माती परिक्षण प्रयोगशाळेची जबाबदारी जिल्हयातील कृषी विज्ञान केंद्रावर सोपविण्यात यावी.

१.५ या फिरत्या माती परिक्षण प्रयोगशाळेवरील कर्मचा-यांची नियुक्ती व इतर सर्व अनुषांगिक खर्च कृषी विज्ञान केंद्र करेल.

१.६ तथापि, संबंधित कृषी विज्ञान केंद्र शेतक-यांकडून मृद व जल नमुना विश्लेषण, साधी माती नमुना तपासणी, विशेष माती नमुना तपासणी, सूक्ष्म व प्रमुख मूलद्रव्य नमुना तपासणी व पाणी नमुना तपासणीसाठी फी वसूल करु शकेल.

१.७ शेतक-यांकडून वसूल करावयाच्या फीचे दर शासनाने निर्धारित केलेल्या दरानुसार आकारले जातील. शासनाने विहित केलेल्या एकूण तपासण्या प्रत्येक महिन्याला करणे संस्थेला बंधनकारक राहील.

१.८ वाहनाची देखभाल व दुरुस्तीवरील सर्व प्रकारच्या खर्चाची जबाबदारी कृषी विज्ञान केंद्राची राहील. त्याकरिता शासनातर्फे कोणत्याही प्रकारचा निधी उपलब्ध करुन दिला जाणार नाही.

<u>मान्यता</u> :

या कार्यक्रमास तांत्रिक मान्यता देण्यासाठी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा मृद सर्वेक्षण व मृद चाचणी अधिकारी व नजीकच्या कृषी संशोधन केंद्रातील मृद रसायन शास्त्रज्ञ यांचा समावेश असलेली तांत्रिक समिती गठित करण्यात यावी व त्यामध्ये मृद विश्लेषणासाठी आवश्यक असणा-या उपकरणांची, काच सामान, रसायने यांची तांत्रिक मान्यता तपासण्यात यावी. तदनंतरच प्रस्तावास तांत्रिक मंजूरी देतील व जिल्हाधिकारी हे प्रशासकीय मंजूरी देतील. या कार्यक्रमावर जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांचे नियंत्रण राहील.

<u>अपेक्षित खर्च</u> :

एका प्रयोगशाळेसाठी उपकरणे, काच सामान, रसायने, जनरेटर, वाहन खरेदी इ. करिता अंदाजे रु.३५ लक्ष याप्रमाणे २ प्रयोगशाळांसाठी रु. ७० लक्ष मर्यादेत खर्च अपेक्षित आहे.

<u>कार्यान्वयीन यंत्रणा</u> :

तांत्रिक मान्यता प्रदान करणारी यंत्रणा ही या कार्यक्रमाची अंमलबजावणी करील.

--------*-------

३. <u>योजनेचे नांव</u> : <u>ग्रामीण भागातील युवकांना स्वयंरोजगाराकरिता व्यवसाय कौशल्याचे प्रशिक्षण देणे.</u>

<u>योजनेचे स्वरुप</u> :

१.१ या कार्यक्रमाअंतर्गत प्रत्येक तालुक्यातील अंदाजे ३०० युवकांना मॉड्युलर एम्लॉयेबल स्कीम (MES) या केंद्र पुरस्कृत योजनेंतर्गत व्यवसाय कौशल्याचे प्रशिक्षण घेण्यासाठी सर्वतोपरी सहाय्य देण्यात येईल.

१.२ प्रशिक्षण देण्याचा कार्यक्रम आय.टी.आय. किंवा इतर शासन मान्यता प्राप्त संस्थेच्या माध्यमातून राबविण्यात यावा.

१.३ ज्या व्यवसायांना ग्रामीण भागात किंवा नजिकच्या छोटया शहरामध्ये स्वयंरोजगाराकरिता किंवा रोजगाराकरिता वाव आहे अशाच व्यवसायांची या प्रशिक्षण कार्यक्रमाकरिता निवड करण्यात यावी.

१.४ प्रशिक्षण कार्यक्रमाचा कालावधी व्यवसायाचे गरजेनुसार असेल.

१.५ या कार्यक्रमांतर्गत प्रत्येक लाभार्थ्याकरिता प्रति दिन रु. १००/- या प्रमाणे प्रशिक्षण कालावधीचे विद्यावेतन व रु.२५००/- पर्यंतचे हत्यारेसंच इत्यादिसाठी कमाल रु. १० हजार इतके सहाय्य करण्यात येईल.

<u>मान्यता</u> :

जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी हे या कार्यक्रमास तांत्रिक मंजूरी देतील व जिल्हाधिकारी हे प्रशासकीय मंजूरी देतील.

<u>अपेक्षित खर्च</u> :

याप्रमाणे प्रति तालुका ३०० लाभार्थ्यांकरिता अंदाजे रु. २१ लक्ष इतका खर्च अपेक्षित राहिल.

<u>कार्यान्वयीन यंत्रणा</u> :

तांत्रिक मान्यता प्रदान करणारी यंत्रणा ही या कार्यक्रमाचे संनियंत्रण करेल.

--------*-------

४. **योजनेचे नांव** : **स्वयंसहाय्यता बचत गटाच्या माध्यमातून ग्रामीण भागात परसबाग, किचन गार्डन योजना राबविणे.**

योजनेचे स्वरुप :

१.१ ग्रामीण भागातील गरीब लोकांना संतुलित आहार उपलब्ध होण्याच्या दृष्टीने प्रत्येक घरी किचन गार्डन विकसित करणे आवश्यक आहे. अशा प्रकारचे किचन गार्डन घराचे मागे अंघोळीच्या किंवा घरगुती कामाकरिता वापरण्यात येणा-या पाण्यावर विकसित करण्यात येईल.

१.२ पहिल्या टप्प्यात हा कार्यक्रम तालुक्यातील २५ गावांत आणि प्रत्येक गावांतील २५ कुटूंबाचे निवासस्थानी राबविण्यात येईल.

१.३ हा संपूर्ण कार्यक्रम स्थानिक पातळीवर काम करणा-या स्वयंसहाय्यता बचत गटाच्या माध्यमातून राबविला जाईल.

१.४ या कार्यक्रमांतर्गत निवड करण्यात आलेल्या लाभार्थ्यांना बियाणे किंवा रोपे तसेच काही प्रमाणात औषधी/ खते उपलब्ध करुन दिले जातील.

१.५ या संपूर्ण कार्यक्रमावर देखरेख ठेवण्याची जबाबदारी संबंधित स्वयंसहायता बचतगटाची राहील. याकरिता स्वयंसहायता बचतगटास आवश्यक प्रशिक्षण सुध्दा दिले जाईल.

१.६ पहिल्या वर्षी हा कार्यक्रम एकूण ६२५ लाभार्थ्याकरिता मर्यादित असेल.फलनिश्पत्ती पाहून लाभार्थ्यांची संख्या वाढविता येईल.

१.७ प्रत्येक लाभार्थी कुटूंबास द्यावयाचे बियाणे,रोपे व खते याकरिता अंदाजे रु. २०० खर्च करता येतील.

मान्यता :

जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी हे या कार्यक्रमास तांत्रिक मंजूरी देतील व जिल्हाधिकारी हे प्रशासकीय मंजूरी देतील.

अपेक्षित खर्च :

प्रत्येक लाभार्थी कुटूंबास द्यावयाचे बियाणे,रोपे व खते याकरिता अंदाजे रु. २०० इतका खर्च येईल असे गृहित धरल्यास, ६२५ लाभार्थ्यांकरिता अंदाजे रु. १.२५ लक्ष इतका खर्च येईल.

कार्यान्वयीन यंत्रणा :

महिलांचा स्वयंसहाय्यता बचत गट या कार्यक्रमाची अंमलबजावणी करील.

--------*-------